# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ / श्रावण २६, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | उप मुख्यमंत्री | |
| (३) | आदिवासी विकास मंत्री | |
| (४) | खनिकर्म मंत्री | |
| (५) | उद्योग मंत्री | |
| (६) | मराठी भाषा मंत्री | |
| (७) | सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**

---

### पुणे येथील आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण प्रकल्पात झालेला गैरव्यवहार

**(१) * ४४७९५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेमार्फत दिनांक १ जानेवारी, २०१८ ते ३१ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास राबविण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण प्रकल्पात गैरव्यवहार झालेला असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मुख्य सचिव यांना माहे, एप्रिल २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन प्राप्त झाल्यानंतर आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून मागविण्यात आलेला अहवाल प्राप्त होण्यास विलंब होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून मागविण्यात आलेला अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालाच्या शिफारशी काय आहेत, तसेच अहवाल प्राप्त होण्यास लागणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, अहवालाच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) मा. श्री. सुरेश धस, वि. प. स. यांचे दिनांक ८ एप्रिल, २०२१ रोजीचे सदर विषयाबाबतचे मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना संबोधून लिहिलेले निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.

सदर प्रकरणी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील दरड कोसळुन भूस्खलनाचा धोका असलेल्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२) * ४७३३८ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात पावसाळयाच्या पार्श्वभुमीवर दरड कोसळणे व भूस्खलनासारखा संभाव्य धोका असलेल्या २३ गावांचे शासकीय तसेच खासगी संस्थांमार्फत सर्वेक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्वेक्षणानुसार दरड कोसळणे व भूस्खलनासारखा संभाव्य धोका असलेली १५ गावे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सर्वेक्षणानुसार १५ गांवापैकी मावळ तालुक्यातील ८ गावे प्रामुख्याने बोरज, कळकराई (सावळा), भुशी, माऊ, तुंग, माळेवाडी, ताजे, लोहगड, इत्यादी घाटमाथा असलेल्या या भागात मोठ्या प्रमाणात दरड कोसळून जीवित व वित्तहानी होऊ शकते असे अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू गावांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाकरिता जागा खरेदीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, दरवर्षी तहसील प्रशासनाकडून आपत्ती निवारणासाठी आराखडे तयार केले जातात तथापि त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, माळीण दुर्घटनेची पुन्हा पुनरावृत्ती होऊ नये तसेच अशा संवेदनशील गावातील नागरिकांच्या संरक्षणाच्या दृष्टीने गावांचे कायमस्वरुपी पुनर्वसनासंदर्भातील प्रस्तावावर निर्णय घेणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) पुणे जिल्हयातील माळीण दुर्घटनेनंतर अशा घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी खालील शासकीय विभागामार्फत ९५ गावांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे.

i. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
ii. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे.

(२) सर्वेक्षणानुसार पुणे जिल्हयात २३ गावे संभाव्य दरड कोसळणारी असल्याचे आढळुन आलेले आहे.

(३) अंशत: खरे आहे,

मावळ तालुक्यामधील मौजे बोरज, माऊ, तुंग, माळेवाडी, ताजे व लोहगड ही सहा गावे अंशत: संभाव्य दरडप्रवण असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

मौजे भुशी या गावाला धोका नसल्याचा अहवाल कार्यकारी अभियंता यांनी दिलेला असून, मौजे कळकराई (सावळा) या गावाचा संभाव्य २३ दरड प्रवण गावांमध्ये समावेश करण्यात आलेला नाही.

(४) नाही.

मौजे बोरज, तुंग, माळेवाडी, ताजे, लोहगड या पाच गावांमध्ये संरक्षणात्मक कामे पूर्ण करण्यात आली असून, मौजे माऊ (गबाले वस्ती, मोरमाची वाडी) येथे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संरक्षणात्मक कामाची कार्यवाही सुरु आहे.

(५) गाव स्तरावर गाव आपत्ती व्यवस्थापन आराखडे दरवर्षी अद्यावत करुन अंमलबजावणीच्या अनुषंगाने गावांमध्ये आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, जनजागृती करण्यात येते.

(६) दरडग्रस्त तसेच संभाव्य दरडप्रवण गावांचे कायमस्वरुपी पुनर्वसन संदर्भातील प्राप्त प्रस्तावांवर प्रस्तावनिहाय उचित कार्यवाही करुन आवश्यकतेनुसार पुनर्वसन करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(७) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**मौजे कारूळ (ता. गुहागर, जि.रत्नागिरी) येथे भूस्खलनामुळे घरांना तडे गेल्याबाबत**

**(३) * ४४७७६ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कारूळ (ता. गुहागर, जि.रत्नागिरी) येथील जांभळेवाडी, गुरववाडी, जोशीवाडी व हुंबरेवाडीलगतचा ३०० मीटरच्या भागात गेल्या तीन वर्षांपासून सतत भूस्खलन होत असल्यामुळे ६३ घरांना तडे जावून धोका निर्माण झाला असून शेकडो जणांचे जीव धोक्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूस्खलनामुळे याच भागातून जाणाऱ्या चिखली-परचुरी रस्त्यालाही तडे गेल्याचे गतवर्षी निदर्शनास आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूस्खलनामुळे बाधित झालेल्या कुटुंबांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बाधित कुटुंबांचे तात्पुरते स्थलांतर जिल्हा परिषद मराठी शाळा, कारुळ येथे करण्याची पर्याप्त व्यवस्था करण्यात आलेली आहे.

(४) बाधित कुटुंबांचे अन्य ठिकाणी अंत्योदय प्रतिष्ठान या खाजगी संस्थेमार्फत पुनर्वसन करण्यात येणार असून, त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील दिव्यांग युडीआयडी कार्ड अभावी शासकिय योजनांच्या लाभापासून वंचित असल्याबाबत**

**(४) * ४५१६९ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांगांना शासकीय योजनांच्या लाभासाठी आवश्यक असलेली "युनिक डिसेबिलिटी आयकार्ड" (युडीआयडी) २ वर्षापूर्वी नाव नोंदणी करुनही अद्यापी वितरीत न झाल्याचे दिनांक २० मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून दोन वर्षांपूर्वीच सदर कार्ड राज्याच्या जिल्हानिहाय समाज कल्याण विभागाकडे पाठविली असताना संबंधित लाभार्थ्यांना त्याचे वितरण झाले नसल्याने त्यांना अनेक योजनांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, केंद्र शासनाकडून एकूण किती युडीआयडी कार्ड्स पाठविण्यात आली व किती कार्ड्स दिव्यांगांना वितरित करण्यात आली आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, तद्नुषंगाने युडीआयडी कार्डस वाटप न केलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(५) असल्यास, दिव्यागांना युडीआयडी कार्ड्स तात्काळ मिळण्यासाठी व शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) केंद्र शासनाकडुन जिल्हा कार्यालयास ३,०५,०८० इतकी ओळखपत्रे प्राप्त आहेत. जिल्हा कार्यालयांकडुन २,४६,२०२ इतकी ओळखपत्रे वितरीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्नभाग- ६ वरिल उत्तरामधील वस्तुस्थिती विचारात घेता प्रश्न उद्भवत नाही.

(५) दिव्यांग कल्याण आयुक्तालयाने सदर ओळखपत्रे ज्या रूग्णालयात तपासणी झालेली आहे त्याच रूग्णालयास पाठविण्याबाबत केंद्र शासनास कळविले होते. त्याअनुषंगाने केंद्रशासनाने प्रत्येक जिल्हास्तरावर एक अथवा राज्यस्तरावर एक अशी यंत्रणा नियुक्त करून देण्याबाबत दि.०७/०८/२०२० रोजी ईमेलद्वारे आयुक्तालयास कळविले त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना वैश्विक ओळखपत्राचे वितरण करण्याबाबत नोडल अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात आले व ओळखपत्राच्या वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना दिव्यांग कल्याण आयुक्तालयाने दि. २८.०८.२०२० अन्वये संबंधित सर्व कार्यालयास निर्गमित केल्या आहेत.

(६) दिव्यांग व्यक्तींना कार्ड वितरीत करण्यात येणारी कार्ड वितरणावेळी दिव्यांग व्यक्ती त्यांच्या पत्त्यावरुन स्थलांतरीत झाल्यामुळे अथवा त्यांच्या संपर्क क्रमांक बदलला असल्यास अश्या दिव्यांग व्यक्तींना शोधुन त्यांच्यापर्यंत पोहचवण्यास अडचणी येत आहेत.

दिव्यांग व्यक्तींना वैश्विक ओळखपत्र वितरीत करतांना येणाऱ्या अडचणींच्या अनुषंगाने जिल्हा कार्यालयास प्राप्त होणाऱ्या वैश्विक ओळखपत्राच्या पाकीटावर पत्त्यासोबत संपर्क क्रमांक देखील छापण्याबाबत विनंती केंद्र शासनास करण्यात आली आहे.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम पीक कर्ज मिळण्याबाबत**

**(५) * ४५९२१ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उस्मानाबाद, अमरावती, बुलढाणा जिल्ह्यांना खरीप हंगामासाठी पीक कर्जाचे १४०० कोटी रुपयांचे लक्ष्यांक निश्चित करण्यात आले असतांना केवळ २० टक्केच कर्जवाटप झाले असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना सततचा दुष्काळ, नापिकी, अतिवृष्टी अशा संकटांना सामोरे जावे लागत असतांना पिक कर्जासाठी मुदतीत अर्ज सादर करुनही राष्ट्रीयकृत व जिल्हा बँका शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी जाणीव पुर्वक दुर्लक्ष करीत असल्याने शेतकऱ्यांना खाजगी सावकारांकडून व वित्तीय संस्थाकडून कर्ज घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उर्वरित पीक कर्ज शेतकऱ्यांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि खरीप, २०२२ हंगामामध्ये माहे जून अखेर पर्यंत बँकांनी उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये रु. ६४३ कोटी (४८%), अमरावती जिल्ह्यामध्ये रु. ९७८ कोटी (७० %) व बुलडाणा जिल्ह्यामध्ये रु. ९०० कोटी (६५%) कर्जवाटप केले आहे.

तसेच राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या सभेमध्ये सर्व बँकांच्या अधिकाऱ्यांना राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्जवाटप विहीत मुदतीत करणेबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत. पीक कर्ज वितरण करणेबाबत बँका व तालुका सहायक निबंधक यांचेकडून गावनिहाय पीक कर्ज मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. शेतकऱ्यांना लवकरात लवकर कर्ज उपलब्ध होण्यासाठी शाखास्तरावर कॅम्प आयोजित करुन शेतकऱ्यांना कर्जवाटप करण्यात येत आहे. तसेच जिल्ह्यातील शेतकरी खातेदार खरीप पीक कर्जापासून वंचित राहणार नाही यासाठी बँका दक्षता घेत आहेत.

-----------------

## राज्यातील आदिवासी समाजातील संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती (एनटीएफएस) योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(६) * ४४८९९ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी ६० वर्षापूर्वी स्थापन केलेल्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस अद्याप स्वतंत्र आर्थिक तरतूद केली नसल्याने उपक्रम राबविताना अनेक अडचणी येत असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर केंद्रीय आदिवासी संचालनालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय अनुसूचित जमाती अभिछात्रवृत्ती (एनटीएफएस) योजनेचा लाभ राज्यातील अल्प विद्यार्थ्यांनाच मिळत असल्याने अनेक पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संशोधनास प्रोत्साहन मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्याचा प्रस्ताव शासनाकडे दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त संस्थेस स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत राबविण्यात येणा-या राज्य व केंद्र योजनांतर्गत प्राप्त होणा-या निधीतुन संबंधित योजनांचा खर्च भागविण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

जनजाती मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत दरवर्षी अनुसुचित जमातीच्या १८०० उमेदवारांना पी.एच.डी. करण्यासाठी अधिछात्रवृत्ती देण्यात येते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदलापूर (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य जलवाहिनीतून पाण्याची चोरी होत असल्याबाबत

**(७) * ४४९९३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि. ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिन्यांना छिद्रे पाडून पाणी माफियांमार्फत रोज जवळपास दीड लाख लीटर पिण्याच्या पाण्याची चोरी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदलापूर पाईपलाईन रोडवर असलेले अनेक हॉटेल, ढाबे, तसेच त्या परिसरातील अनधिकृत सर्व्हिसिंग सेंटर सदर जलवाहिन्यांतून पाणी चोरी करुन वाहने धुण्यासाठी पाणी वापरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिन्यांतून कल्याण-डोंबिवली, ठाणे, नवी मुंबई व मीरा-भाईंदर या महानगरपालिकांना पाणी पुरवठा केला जात असून डोंबिवलीतील संदप गावात पाण्यासाठी एकाच कुटुंबातील पाच जणांना प्राण गमवावे लागल्याने तेथील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बदलापूर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिन्यांतून बेकायदेशीर व अनियंत्रित पाणी चोरीचा तपास करून सदरहू चोरी थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या २७ गावांना पाणी पुरवठा करण्या करिता कल्याण डोंबिवली महानगरपालिका पाण्याचा "उद्भव" म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसीच्या) जलवाहिन्यांचा वापर करते. महामंडळाच्या मुख्य जलवाहिनीवरील नळजोडणी नंतरची अंतर्गत पाणी पुरवठयाच्या वितरण व्यवस्थेची जबाबदारी ही पूर्णत: कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची आहे.

दि.०६.०५.२०२२ रोजी डोंबिवली मधील देसलेपाडा येथील गायकवाड कुटूंबातील दोन महीला व तीन मुले एकूण पाच सदस्य खदाणीमध्ये कपडे धुण्यासाठी गेले असता खदाणीमधील पाण्यात बुडून मृत्यु झाल्याची नोंद मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली (पू.) येथील नोंदवहीत घेण्यात आली आहे.

(४) काटई ते बदलापूर रस्त्यावरील बारवी गुरुत्व वाहिनी (साखळी क्र.६३०० मी. ते १५६०० मी.) व कल्याण फिडर जोड वाहिनीवर होत असलेल्या अनधिकृत नळजोडण्या न होण्यासाठी संपूर्ण जलवाहिन्यांच्या भागावर देखरेख ठेवण्यासाठी सिक्युरिटी एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य सुरक्षा बलाचे सुरक्षा रक्षक यांची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार म.औ.वि.महामंडळातर्फे १७७२ मि.मी. व्यासाच्या दोन व १६०० मि.मी. व्यासाची एक अशा जलवाहीन्यांच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा बलाचे सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले आहेत.

म.औ.वि.महामंडळातर्फे संबंधित अनधिकृत नळजोडण्या करणा-या व्यक्तींवर दि.१३/०५/२०१६, दि.१९/११/२०१८, दि. २०/०६/२०२०, दि. १८/०३/२०२१ व दि. ०८/०८/२०२१ रोजी फौजदारीगुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. मानपाडा पोलिस स्टेशन, डोंबिवली यांचेतर्फे संबंधित व्यक्तिंची चौकशी चालू आहे. तसेच म.औ.वि.महामंडळाने १७७२ मि.मी. व्यासाच्या २, १६०० मि.मी. व्यासाची १ अशा काटई ते बदलापूर रस्त्यावरील पाईपलाईनवर होत असलेल्या ४५४३ अनधिकृत नळजोडण्या माहे मे २०२२ अखेर पर्यंत निष्कासित केल्या आहेत. अनधिकृत नळजोडण्या पुन्हा आढळून आल्यास त्या ताबडतोब तोडून त्यावर वेल्डींग करण्याचे काम प्राधान्याने करण्यात येऊन पाणी गळती बंद करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या समता प्रतिष्ठान मार्फत राबविण्यात आलेल्या सामाजिक उपक्रमाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(८) * ४५३६२ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या समता प्रतिष्ठान समता प्रतिष्ठानमार्फत राबविण्यात आलेल्या सामाजिक उपक्रमाच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामांमध्ये झालेल्या १४ कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी विशेष तपास पथकामार्फत करण्याचे आश्वासन सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी देऊनही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) दिनांक १६.१२.२०२० रोजी संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये मा.मंत्री (सा.न्या.) महोदयांनी प्रस्तुत प्रकरणाची चौकशी सुरु करण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने दि.१४.१२.२०२१ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (सा.न्या.व वि.स.) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नव्याने गठित केली. सदर चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून शासन आदेशानुसार त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अल्प मुदतीच्या पीक कर्जावरील बंद केलेली २ टक्के व्याज परताव्याची सवलत पुन्हा सुरु करण्याबाबत

**(९) * ४५६५० श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने दिनांक २८ मार्च, २०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये अल्प मुदतीच्या पीक कर्ज वाटपात बँकाना दिला जाणारा २ टक्के व्याज परतावा बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे राज्यातील ७० लाखापेक्षा अधिक पीक कर्जावरील व्याज परतावा बंद झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू व्याज परतावा केंद्र शासनाने पुन्हा सुरु करावा व शेतकऱ्यांना तसेच जिल्हा सरकारी बँकाना दिलासा द्यावा अशी मागणी करणारे पत्र मा.मुख्यमंत्री यांनी केंद्रीय कृषीमंत्री यांना दिनांक ३० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने उक्त सवलत बंद केल्यामुळे पीक कर्ज महागणार असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी शासनाकडे केल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निर्णयामुळे शेतकरी व अनेक बँकांना कोट्यवधीचा तोटा सहन करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पीक कर्जावरील बंद केलेली २ टक्के सवलत पुन्हा सुरु करण्याबाबत केंद्र शासनाकडे करावयाच्या पाठपुराव्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे : (**१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

नाबार्डच्या दि. २९/०३/२०२२ च्या परिपत्रकानुसार सन २०२२-२३ पासून अल्प मुदतीच्या पीक कर्ज वाटपात २% परतावा सहकारी व व्यापारी बँकांना केंद्र शासनाकडून प्राप्त होणार नाही. सदर परतावा बंद झाल्यास व बँकांना ७% दराने शेतकऱ्यांना पीक कर्ज पुरवठा करणे क्रमप्राप्त झाल्यास जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिक नुकसान संभवत आहे. त्यामुळे बँकांचा पीक कर्ज वितरणामधील सहभाग कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सन २०२१-२२ मध्ये राज्यात सुमारे ५४ लाख कर्जखात्यांना अल्पमुदत पीक कर्जाचे वितरण करण्यात आले असून उपरोक्त निर्णयामुळे अंदाजे ५० लाख शेतकऱ्यांवर पीक कर्जावरील व्याज परतावा बंद झाल्याचा परिणाम होऊ शकतो. ही बाब विचारात घेता, पीक कर्जावरील बंद केलेला २ टक्के व्याज परतावा सहकारी बँकांना पुन्हा सुरु करण्याची मागणी दिनांक ३०/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री यांनी केंद्रीय कृषि मंत्री यांचेकडे केली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाटे बांदचा वाडा (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) परिसरात खंडीत करण्यात आलेला विदयुत पुरवठा नियमित सुरु करण्याबाबत

**(१०) * ४७१९० श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाटे बांदचा वाडा (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील ग्रामस्थांनी अदा केलेली विदयुत देयकाची रक्कम विदयुत वितरण कंपनीमधील अधिकारी व वायरमन यांनी विदयुत वितरण कंपनीच्या खात्यामध्ये भरणा न केल्यामुळे ग्राहकांचा विदयुत पुरवठा खंडीत करण्यात आल्याची बाब माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामस्थांनी नाटे पोलीस स्थानकात रितसर तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, नाटे बांदचा वाडा परिसरात खंडीत करण्यात आलेला विदयुत पुरवठा नियमित सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे. नाटे बांदचा वाडा, तालुका राजापूर, जिल्हा रत्नागिरी येथील एक ग्राहक श्री. चंद्रकांत हरमळकर यांनी महावितरणच्या तंत्रज्ञाविरुध्द सागरी पोलीस ठाणे, नाटे येथे तक्रार दाखल केली आहे. ते वापरत असलेले वीज जोडणीचे मासिक वीज देयक दर महिना नियमित भरत नसल्याचे निदर्शनास आले असून मागील आर्थिक वर्षात सदर ग्राहकाने फक्त दोन वेळा थकबाकी रक्कमेचा भरणा केला आहे. तसेच सदर तक्रारदार विहीत वेळेत वीज देयक भरत नसल्याने सदर वीज जोडणी मागील आर्थिक वर्षात एकूण तीन वेळा तात्पुरते बंद करण्यात आले.
(२) हे खरे आहे.
(३) उपकार्यकारी अभियंता, उपविभाग राजापूर १ यांनी उक्त तक्रारीबाबत सखोल चौकशी केली आहे. तक्रारदार वापरत असलेले वीज जोडणीवर एकूण रक्कम रु. १३,७१०/- इतकी वीज देयकाची थकबाकी असल्याने दि. ३१.०५.२०२२ रोजी तात्पुरते खंडित करण्यात आले. उक्त प्रकरणी प्राथमिक चौकशी दरम्यान महावितरणचा कोणताही कर्मचारी दोषी असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) नाटे बांदचा वाडा परिसरातील ज्या ग्राहकांनी वीज बिल थकबाकी अदा केली आहे, अशा वीज पुरवठा खंडीत केलेल्या ग्राहकांचा वीज पुरवठा पुर्नजोडणी करुन दिला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खिर्डी, धामोडी, रोझोदयासह ता.रावेर (जि.जळगांव) येथे वादळामुळे केळी बागायतदारांचे नुकसान झाल्याबाबत**

**(११) * ४६९६१ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खिर्डी, धामोडी, रोझोदयासह ता.रावेर (जि.जळगांव) येथे दिनांक ८ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या वादळामुळे केळी बागायतदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पालकमंत्र्यांनी तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुषंगाने बागायदारांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे पूर्ण करण्यात आले असून नुकसानीकरिता निधी मागणीचा प्रस्ताव अद्याप शासनास अप्राप्त आहे. हे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निकषानुसार शासनाच्या मान्यतेने निधी वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**वलीनगर पिंप्री (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथे पावरग्रीड कंपनीने उभारलेल्या पारेषण वाहिनीने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१२) * ४७६८७ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वलीनगर पिंप्री (ता.राळेगाव, जि यवतमाळ) परिसरातील शेतक-यांच्या शेतामधुन पावरग्रीड कंपनीमार्फत देवळी ते हैद्राबाद ७६५ के.व्ही. टाकण्यात आलेल्या टॉवर लाईनसंदर्भात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली नसल्याचे दिनाक २० मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टॉवरखाली गेलेल्या शेतक-यांच्या शेतजमीनीचे उपविभागीय अधिकारी महसुल राळेगाव (जि.यवतमाळ) यांनी मुल्यांकन करून जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून सदरहू मुल्यांकनानुसार पॉवरग्रीड कंपनीमार्फत शेतकऱ्यांना शेतजमिनीचा मोबदला देण्यात यावा अशी मागणी शेतकरी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना शेतजमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) वलीनगर पिंप्री (ता. राळेगाव, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीतून जाणाऱ्या ७६५ के.व्ही वर्धा-निजामाबाद पारेषण वाहिनीने बाधित एकूण १२१ शेतकऱ्यांपैकी ७९ शेतकऱ्यांना उपविभागीय राळेगाव यांच्या दि.११.०६.२०१९ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या मुल्यांकनानुसार

दि.१३.०९.२०१९ रोजी e-payment व्दारे नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. उर्वरीत कळंब तालुक्यातील ३२ व राळेगाव तालुक्यातील १० अशा एकूण ४२ शेतकऱ्यांनी आपले बँक तपशील देण्यास नकार दिल्यामुळे पॉवरग्रीड वर्धा कंपनी त्यांना मोबदला अदा करु शकलेले नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथील वीजपुरवठा रेणुकापूर उपकेंद्रावरून सुरू करण्याबाबत

**(१३) * ४६५४५ श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) शहराला कोंडेश्वर उपकेंद्रावरुन होणारा वीज पुरवठा जास्त प्रमाणात असलेल्या वीज जोडण्यांमुळे योग्य दाबाने होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत दोन वर्षांपासून रेणुकापूर उपकेंद्रावरून लाईन जोडण्याचा प्रस्ताव अमरावती विभागातून मुंबई मुख्य कार्यालयाकडे देण्यात येऊनही अद्यापी उक्त प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदगाव खंडेश्वर येथील वीजपुरवठा रेणुकापूर उपकेंद्रावरून सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (धामणगाव रेल्वे) यांनी ऊर्जा मंत्री यांना दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सदरहू प्रकरणी लाईन जोडण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

रब्बी हंगामामध्ये नांदगाव खंडेश्वर तालुका परिसरामध्ये कृषी वाहिनीवर वीज जोडण्याचा अतिरिक्त भार वाढून काही प्रमाणात कमी दाबाच्या वीज पुरवठयाची समस्या निर्माण होते.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) नेर तालुक्यातील २२०/३३ के. व्ही अतिउच्चदाब उपकेंद्रातून ३३ के. व्ही. नवीन वाहिनी उभारणी करण्याचे प्रस्ताव मंजूर करुन सदर कामाकरिता निविदा काढण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नेरे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील विदयुत उपकेंद्राचे काम सुरु करण्याबाबत

**(१४) * ४४८३० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरे (ता.पनवेल, जि.रायगड) परिसरातील वाढते नागरिकीकरण लक्षात घेता विदयुत पुरवठा सुरळीत होण्यासाठी ५ वर्षापूर्वी मंजूर झालेल्या विदयुत उपकेंद्राच्या कामाला अद्यापही सुरूवात झाली नसल्याचे माहे जून २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे नेरे विभागात ५ वर्षापूर्वी मंजूर झालेले विदयुत उपकेंद्र सुरू न झाल्यामुळे जवळपास २० ते २२ हजार वीज ग्राहक तसेच ५० गाव - वाडयांचा समावेश असलेल्या विभागात वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नेरे विभागात विदयुत पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने विदयुत उपकेंद्र तातडीने सुरू करण्याबाबत तसेच विद्युत उपकेंद्राच्या कामाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणा-या संबधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

नेरे गाव व परिसरास ३३/२२ केव्ही आकुर्ली उपकेंद्रातून वीज पुरवठा करण्यात येत असल्याने या परिसरात विद्युत पुरवठा गुणवत्तेत सुधारणा झाली आहे.
(३) नेरे याठिकाणी स्वतंत्र ३३/२२ केव्ही, १ x १० MVA क्षमतेचे स्वतंत्र उपकेंद्र उभारण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. सदर कामासाठी मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर या विद्युत ठेकेदारांस कार्यादेश देण्यात आला होता. मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर या ठेकेदाराने काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने नेरे उपकेंद्राचे काम नव्याने निविदा काढून मे. सुदर्शन इलेक्ट्रिकल इंजिनिअर वर्कस यांना दिले. त्यानुसार त्यांनी कंट्रोल रुम रिपेअरिंगचे काम, उपकेंद्राचे संरक्षण भिंतीचे काम सुरु केले होते परंतु पुर्ण केले नाही. मे. सुदर्शन इलेक्ट्रिकल इंजिनिअर वर्कस यांना नेरे उपकेंद्राचे काम पुर्ण करण्याकरिता वारंवार कालावधी वाढवून देण्यात आला परंतु कंत्राटदाराने काम सुरु न केल्याने कार्यादेश रद्द करण्याबाबतची कारणे दाखवा नोटीस त्यांना दिली. मे. सुदर्शन इलेक्ट्रिकल इंजिनीअर वर्कस यांना Show Cause For Termination of Contract करुन या कामाची निविदा कंत्राट दाराच्या रिस्क ॲण्ड कॉस्ट वर करण्याचे योजिले आहे. आज अखेर संरक्षक भिंत व कंट्रोल वायरिंगचे किरकोळ काम वगळता नेरे उपकेंद्राची इतर कोणतेही काम झाले नाही म्हणून हे काम RDSS योजनेअंतर्गत प्रस्तावित केले नाही.

दरम्यानच्या काळात नेरे गावाजवळील आकुर्ली गावात दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजने अंतर्गत ३३/२२ केव्ही २ x १० MVA क्षमतेचे नवीन उपकेंद्र दि. १७.०३.२०२० रोजी कार्यान्वित करण्यात आले. त्यामुळे नेरे परिसरात वीज पुरवठा करणाऱ्या २२ केव्ही वाहिनीची लांबी १८ किमीने कमी झाल्याने वीज पुरवठा गुणवत्तेत सुधारणा झाली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुर्लभ वंचित घटकांतील विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित असल्याबाबत

**(१५) * ४६००७ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: सोलापूर, अमरावती, हिंगोली, पुणे जिल्ह्यातील मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील सुमारे ६६ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज अद्यापही महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिष्यवृत्तीचे अर्ज निकाली काढण्यासाठी महाविद्यालयांना वारंवार मुदतवाढ देण्यात येऊनही अर्ज निकाली न निघाल्याने विद्यार्थ्यांचे आर्थिक व शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रकरणी प्रलंबित शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना तात्काळ अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) दिनांक ०४/०८/२०२२ पर्यंत सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षाकरीताचे राज्यभरात विद्यार्थी स्तरावर १८,४१० अर्ज व महाविद्यालयस्तरावर १२,७४४ अर्ज प्रलंबित असून शासन पत्र दि. २ ऑगस्ट, २०२२ अन्वये दि. १३ ऑगस्ट, २०२२ पर्यंत विद्यार्थ्यांना अर्ज करण्याकरीता तसेच दिनांक २० ऑगस्ट, २०२२ पर्यंत महाविद्यालय व जिल्हास्तरावरील अर्ज निकाली काढण्याकारीता संबंधीतांना मुदतवाढ देण्यांत आलेली आहे.

विद्यार्थी व महाविद्यालय यांच्या स्तरावरील अर्ज कोणत्याही स्वरुपात प्रलंबित राहू नयेत यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालये यांच्याव्दारे वेळोवेळी विद्यार्थी - पालक संघटनांची व्हिडीओ कॉन्फरन्स, महाविद्यालयातील कर्मचा-यांची कार्यशाळा इत्यादी उपक्रम राबविण्यांत येत आहेत. तसेच महाविद्यालयांना प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी वृत्तपत्राव्दारे आवाहन करण्यांत आले आहे. त्याच प्रमाणे संबंधीत शैक्षणिक यंत्रणा व विभाग (उदा. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, नर्सिंग परिषदा, शिक्षण शुल्क समिति व राज्यातील सर्व विद्यापिठे) यांना देखील वेळोवेळी त्यांच्या अधिनस्त संस्थास्तरावरील प्रलंबीत अर्जांचा निपटारा करण्याबाबत सूचित करण्यांत आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माणिकपूर व वाई खुर्द (ता. वरुड, जि. अमरावती) तसेच धानोरा (ता. मोर्शी, जि.अमरावती) येथे कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(१६) * ४७४०६ श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुड-मोर्शी मतदार संघामध्ये सुमारे २५ टक्के आदिवासी लोकसंख्या असून दहावी नंतर आदिवासी विद्यार्थ्यांकरिता कनिष्ठ महाविद्यालय उपलब्ध नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मतदार संघातील आदिवासी विद्यार्थ्यांना दहावी नंतरचे शिक्षण घेण्याकरिता इतर तालुक्यात जावे लागत असल्याने माणिकपूर व वाई खुर्द (ता.वरुड, जि. अमरावती) येथे प्रशस्त इमारत असून येथे नैसर्गिक वर्ग वाढीप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माणिकपूर व वाई खुर्द (ता. वरुड, जि. अमरावती) तसेच धानोरा, (ता. मोर्शी, जि.गडचिरोली) येथे कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांचेकडे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपरोक्त कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) होय, हे खरे आहे.

प्रकल्प कार्यालय, धारणी अंतर्गत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा वाई खुर्द ( ता. वरुड जि. अमरावती ) तसेच शासकीय माध्यमिक आश्रमशाळा माणिकपूर ( ता. मोर्शी जि. अमरावती ) व शासकीय माध्यमिक आश्रमशाळा धानोरा ( ता. मोर्शी जि. अमरावती ) येथे इ. १ ली ते इ. १० वी पर्यंत शाळा सुरु आहेत.

उक्त शाळांमध्ये वर्गवाढ करुन इ. ११ वी तसेच इ. १२ वी वर्ग सुरु करण्यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडून मागविण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा अहवाल आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडून प्राप्त झाल्यावर नियमोचित कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## एडवण (जि.पालघर) येथे चक्रीवादळ निवारा केंद्र बांधण्याबाबत

**(१७) * ४७८३८ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एडवण (जि.पालघर) येथे समुद्र किनाऱ्यावर सतत उद्‌भवणाऱ्या लाटांचा धोका लक्षात घेऊन किनाऱ्यांवरील नागरीकांचे संरक्षण व्हावे याकरीता चक्रीवादळ निवारा केंद्र बांधण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळून चार वर्ष पुर्ण झाले असून अद्यापि कामाला सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चक्रीवादळ निवारा केंद्रासाठी निधी मंजुर झालेला असतांनाही निवारा केंद्राचे काम सुरु न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, तद्नुषंगाने सदरहू निवारा केंद्राचे काम तातडीने सुरु करुन पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे** : (१), (२) व (३) राष्ट्रीय चक्रिवादळ धोके निवारण प्रकल्प हा जागतिक बँक अर्थसहाय्यित प्रकल्प असून या प्रकल्पात चक्रिवादळ निवारा केंद्र बांधणे या कामाचा समावेश करण्यात आला होता. सदर काम करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. तथापि, निविदेला प्रतिसाद न मिळाल्याने ३ वेळा फेरनिविदा काढण्यात आली. त्याअंती निविदेस प्रतिसाद प्राप्त झाला. परंतु किंमतीत वाढ झाल्याने व निविदा रक्कम व्यवहार्य नसल्याने प्रकिया रद्द झाली.

रु. ३२०० कोटी इतक्या रक्कमेच्या कोकण आपत्ती सौम्यिकरण प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये चक्रिवादळ निवारा केंद्र या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच या केंद्राचा नवीन आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या

**(१८) * ४४५७१ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांचे अनेक प्रस्ताव शासनाच्या जाचक अटी व निकषांमुळे अपात्र होत असून, पात्र प्रस्तावांवर तात्काळ कार्यवाही होत नसल्याने आर्थिक मदत मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना ४ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची योजना जाहीर केली असून अद्यापी शेतकऱ्यांना उक्त योजनेचा लाभ मिळत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून रोखण्याबाबत व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे. माहे जून, २०२२ मध्ये एकूण २३० शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली आहेत.
(२) हे खरे नाही. शासन निर्णय महसुल व वन विभाग, क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि. १९.१२.२००५ अन्वये, नापिकी, राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करू शकल्यामूळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा हे ३ निकष आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना तातडीची मदत देण्याकरिता ठरविण्यात आले आहेत. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि. २३.०१.२००६ अन्वये शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही जिल्हास्तरीय समित्यांमार्फत सुरू असून, वरील तीन कारणांमुळे आत्महत्या घडली असल्यास जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरविलेल्या प्रकरणांत संबंधित आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटंबियांना रू.१ लक्ष मदत देण्यात येते.
(३) हे खरे नाही.
(४) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१. शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना

२. विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी "कृषी समृध्दी" योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना करण्यात आल्या.

३. शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना मोफत शिक्षणाची योजना यांच्या अंमलबजावणीला गती देणे यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुर्नरचना करण्यात आली आहे.

४. शेतमालाला हमीभाव, PM-KISAN सारख्या योजनांमार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात आली.

पात्र शेतकरी आत्महत्यां प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना दिनांक २३.०१.२००६ च्या शासन निर्णयानुसार रू.१ लक्ष मदत देण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील समाज कल्याण विभागाच्या वसतिगृहात कोरोना बाधितांनी वापरलेल्या गाद्या वसतिगृहातील मुलींना दिल्याबाबत

**(१९) * ४५४२८ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील समाज कल्याण वसतिगृहामध्ये कोरोना बाधीत रुग्णांनी वापरलेल्या गाद्या व खाटा वसतीगृहातील मुलींना वापरण्यासाठी देण्यात आल्याची बाब निदर्शनास आली असून याबाबत अनुसूचित जाती जमाती कडे तक्रार देखील करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, तदनुषंगाने मागासवर्गीय मुलींच्या आरोग्याशी खेळण्याचा प्रयत्न करणाऱ्या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतक-यांना योग्य भाव मिळण्याबाबत

**(२०) * ४५९०२ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात कांद्याची आवक वाढली असुन तसेच दर घसरल्यामुळे कांद्याला प्रतिकिलो साधारणपणे केवळ एक रुपये भाव मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकरी संकटात आल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एक रुपया भाव मिळत असल्याने शेतक-यांचा उत्पादनाचा खर्च न निघता आडत्यांना प्रति किलो सात रुपये देण्याची वेळ शेतक-यांवर आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कांदा उत्पादक शेतक-यांना जास्तीत जास्त भाव देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत:खरे आहे.

दिनांक ११.०५.२०२२ रोजी श्री.ओंकार पाटेकर, अंजनगांव खेलोबा, माढा यांनी कृषी उत्पन्न बाजारसमिती, सोलापूरधील परवानाधारक आडते सोलापूर ओनियन कंपनी चालक नसीम अहमद बशीर अहमद खलिफा यांचेकडे ४० पिशवी कांदा हा नियंत्रित विक्रीसाठी आणला होता. श्री.पाटेकर यांनी आणलेला कांदा रब्बी हंगामातील असल्याने निकृष्ट दर्जाचा होता. सदर कांद्याची संबंधित शेतकऱ्याच्या उपस्थित व त्याच्या संमतीने विक्रीसाठी मिळालेली रक्कम अत्यल्प दिसून येते. तसेच श्री.पाटेकर यांच्या बिलातून हमाली, तोलाई व स्त्री हमालीच्या रकमा वसूल केलेल्या आहेत. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३१ अन्वये बाजार फी व सुपरव्हीजन फीची वसूली आडत्याकडून केली जाते.
(३) राज्यात घेण्यात येणाऱ्या खरीप, लेट खरीप व रब्बी हंगामातील कांद्यासाठी एकूण उत्पादन, देशांतर्गत मागणी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील वस्तुस्थिती/ सद्यस्थिती याआधारे बाजारभाव मिळतो. केंद्रशासनाने कांदा निर्यातीसाठी किमान निर्यात मुल्य (MEP) शून्य केले असून, २०२१ मध्ये सुरु केलेल्या RoDTEP योजनेंअतर्गत कांद्यासाठी २% वाहतूक अनुदान दिले जाते. त्याचबरोबर कृषी पणन मंडळ, पुणे च्या वाहतूक अनुदान योजनेंतर्गत अन्य राज्यात केल्या जाणाऱ्या शेतमालाच्या वाहतूकीसाठी अनुदान दिले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नाफेड अंतर्गत बंद असलेली हरभरा खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत

**(२१) * ४४५५८ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यातील नाफेडमार्फत सुरु असलेली हरभरा खरेदी केंद्र उद्दिष्ट पुर्ण झाल्याची कारणे देवून अचानक मुदतपूर्व बंद करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांना हरभरा पिकाची विक्री कमी भावात खुल्या बाजारात करावी लागत असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचण निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू खरेदी केंद्र तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) राज्यात हमीभावाने खरेदी दिनांक ०१.०३.२०२२ सुरु झाली होती. तथापि, खरेदीसाठी दिलेल्या उद्दीष्टाची पूर्तता झाल्याने दिनांक २३.०५.२०२२ रोजी NeML पोर्टल बंद झाले होते.
(२) नाही.
(३) राज्यात हमीभावाने खरेदीसाठी सुरुवातीस ६८.९२ लाख क्विंटलचे उद्दिष्ट निश्चित केले होते. तद्नंतर हरभरा उत्पादनातील वाढ आणि शिल्लक शेतकऱ्यांची संख्या विचारात घेऊन खरेदीच्या उद्दिष्टात आणि खरेदी कालावधीत वाढ करण्यासाठी राज्यशासनाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने केंद्रशासनाने ७७,६४,६०० क्विंटल सुधारित उद्दिष्ट निश्चित करुन खरेदी कालावधी दिनांक १८.०६.२०२२ पर्यंत वाढविला होता.

हमीभावाने खरेदी अंतर्गत ४,१२,७८८ शेतकऱ्यांकडून ७६.०३ लाख क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परराज्यात नामांकित संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थांसाठी "शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" प्रभावीपणे राबविण्याबाबत**

**(२२) * ४४५६० श्री.सुनील राणे (बोरीवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाच्या वतीने परराज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांसाठीची शिक्षण शुल्क प्रतीपूर्ती योजनेची (फ्री-शीप) योग्यरीत्या अंमलबजावणी होत नसून अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर योजनेस मंत्रीमंडळाची दरवर्षी मान्यता न घेण्याचे धोरण स्विकारुनही उक्त धोरणाची अंमलबजावणी अधिकाऱ्यांमार्फत सन २०१७-१८ पासून होत नसल्याने सदर योजना बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत तसेच उक्त योजना राबविण्याकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत नियमित कर्ज परतफेड करणारे शेतकरी प्रोत्साहनपर अनुदानापासून वंचित राहिल्याबाबत**

**(२३) * ४४६०३ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे रुपये २ लक्ष पर्यंत कर्ज माफीचा आदेश निर्गमित करुन दोन वर्षाचा कालावधी होऊनही राज्यातील हजारो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासुन वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजार पर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा करुनही या संदर्भात शासन निर्णय निर्गमित न केल्यामुळे अनेक शेतकरी उक्त लाभापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी बँकाच्या आडमुठेपणाच्या धोरणामुळे पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनात्मक अनुदान मिळण्यास अडचणी निर्माण झाल्या असल्याचे दिनांक १२ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, राज्यातील २० लाख पात्र शेतकऱ्यांना रुपये ५० हजारापर्यंत प्रोत्साहनपर अनुदान तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत पात्र कर्जखातेदार शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(२), (३) व (४) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेबाबत दि. २९.०७.२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे व शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यातील महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्रा करीता संपादीत करण्यात आलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत**

**(२४) * ४४५८४ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्रा करीता संपादीत करण्यात आलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळण्यासाठी ३ महिन्यात सर्व सुनावण्या पूर्ण करण्याचा निर्णय उद्योग मंत्री यांनी दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सुनावण्या पूर्ण झाल्या आहेत काय व किती शेतकऱ्यांना जमिनी परत करण्यात आल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्याकरिता जमिनी खरेदी केल्यानंतर १५ वर्षाचा कालावधी होवून देखील कंपनीमार्फत सदर विशेष आर्थिक क्षेत्र विकसित झाले नसल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेत जमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३(१) (अ) मधील तरतुदीनुसार त्यांच्या जमिनी परत करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे दावे दाखल केले आहेत. सदर दाव्यावर सुनावणीची प्रक्रिया जिल्हाधिकारी, रायगड यांच्या स्तरावर सुरु आहे. या विषयाच्या अनुषंगाने सन २०२२ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात उपस्थित केलेल्या विधानसभा तारांकित प्रश्न क्र.४२२३७ च्या संदर्भात दिनांक २१/०३/२०२२ रोजी विधीमंडळात झालेल्या चर्चेच्या वेळी सुनावणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण करुन त्याबाबत निर्णय घ्यावेत, यासाठी ३ महिन्याची मुदत देण्यात येत आहे अशा सूचना तत्कालीन मा.मंत्री (उद्योग) यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांना दिल्या आहेत.

(२) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेत जमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३(१) (अ) मधील तरतुदीनुसार त्यांच्या जमिनी परत करण्याबाबत ३६१ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे दावे दाखल केले आहेत. सदर दाव्यावर दिनांक ०२/०३/२०२२, १६/०३/२०२२, २३/०३/२०२२, ३०/०३/२०२२, ०६/०४/२०२२, २५/०५/२०२२, ०८/०६/२०२२, २९/०६/२०२२, १३/०७/२०२२ व दि.०३/०८/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. दि.२९/०६/२०२२ रोजीच्या सुनावणीच्या वेळी कंपनीचे वकील हजर होते. सदर सुनावणीनंतर आणखी १३९ प्रकल्पग्रस्तांनी दावे दाखल केले. अशा प्रकारे प्रकल्पग्रस्तांनी दाखल केलेल्या ५०० दाव्यामध्ये एकत्रित पुढील सुनावणी दि.२४/०८/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

(३) सदरचे प्रकरण हे “अर्धन्यायिक” स्वरुपाचे आहे. सुनावणीच्या वेळी मे. मुंबई इंटीग्रेटेड सेझ कंपनी लि. यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे युक्तीवाद करण्यास वेळ मागितला आहे. प्रकल्पग्रस्त शेतकरी यांचेमार्फत देखील सुनावणीच्या वेळी अतिरिक्त युक्तीवाद सादर करण्यात येत आहे. दोन्ही पक्षकारांना युक्तीवादासाठी वेळ देणे आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी यांचे स्तरावर निर्णय घेण्यास विलंब होत आहे.

-----------------

**जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील आदिवासी भागातील शेतकऱ्यांकडून आदिवासी विकास महामंडळाने हिरडा खरेदी बंद केल्याबाबत**

**(२५) * ४६३९७ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील पश्चिम व उत्तर आदिवासी भागातील शेतकरी हिरडा गोळा करण्याचे काम करीत असून आदिवासी विकास महामंडळाकडून गत सहा वर्षांपासून उक्त परिसरातून हिरडा खरेदी बंद केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी शेतकऱ्यांकडे विक्रीसाठी हिरडा तयार असून देखील हिरडयाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी राबविण्यात आलेल्या योजना देखील बंद केल्या असल्याचे माहे, मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन जुन्नर तालुक्यातील पश्चिम व उत्तर आदिवासी भागातील बंद असलेली हिरडा खरेदी केंद्र तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

हंगाम २०११-१२ पासुन ऐच्छिक खरेदी योजने अंतर्गत आदिवासी सहकारी संस्थेमार्फत व ज्या ठिकाणी संस्था खरेदी करीत नाहीत त्या ठिकाणी महामंडळाचे खरेदी केंद्रे सुरु करुन प्रकार निहाय हिरडा मालाची खरेदी करण्यात आलेली आहे. सदर ऐच्छिक खरेदी योजना ही सन २०११-१२ ते २०१६-१७ पर्यंत सुरु होती.

सन २०१४-१५ पासुन केंद्रशासनाची किमान आधारभुत दरावर आधारीत (MSP For MFP) गौण वनउपज खरेदी योजना राबविण्यात येत आहे. सन २०१७-१८ ते २०१९-२० पर्यंत केंद्रशासनाच्या (MSP For MFP) या योजने अंतर्गत हिरडयाची खरेदी करण्यात आलेली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

एकाधिकार व ऐच्छिक खरेदी योजनेमध्ये हिरडा खरेदीचे दर जिल्हाधिकारी यांनी मंजुर केलेल्या दरानुसारच सदर हिरडा खरेदी करण्यात येत होती.आदिवासी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असलेचे महामंडळाच्या निर्दशनास आलेले नाही तसेच महामंडळाकडे कोणत्याही शेतकऱ्यांची तक्रार प्राप्त झालेली नाही.

सदयःस्थितीत केंद्रशासनाची किमान आधारभुत दरावर आधारीत (MSP For MFP) गौणवनउपज खरेदी योजने अंतर्गत हिरडयास रु.१५/- प्रति किलो दर केंद्र शासनाने जाहिर केलेले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरोळे (ता.भिंवडी, जि. ठाणे) येथील आश्रमशाळेत झालेल्या अन्न विषबाधेत एका विद्यार्थीनीचा झालेला मृत्यू

**(२६) * ४५०१५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळे (ता.भिंवडी, जि. ठाणे) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आश्रमशाळेतील १७ विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याचे दिनांक २८ मार्च, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विषबाधेमुळे नऊ वर्षाच्या एका विद्यार्थीनीचा दिनांक २९ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास मृत्यु झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मृत विद्यार्थीनीच्या शवविच्छेदन अहवाल तसेच वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आलेला व्हिसेरा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास उक्त अहवालात काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मृत विद्यार्थीनीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच भेसळयुक्त अन्नपुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच अशी दुर्घटना भविष्यात घडू नये यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुदानित आश्रमशाळा शिरोळे, ता. भिवंडी, जि. ठाणे या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मार्च, २०२२ मध्ये अन्नातुन विषबाधा झाल्याचे निदर्शनास आले नाही. मात्र या आश्रमशाळेतील विद्यार्थीनी कु. ज्योत्स्ना जयवंत सांबर हिचा दि. २९.०३.२०२२ रोजी मृत्यु झाला आहे. व्हिसेरा अहवालामध्ये, हा मृत्यु विषबाधेमुळे झाला नसल्याचे नमूद आहे. वैद्यकिय अधिकारी इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय, भिवंडी यांच्या अहवालानुसार सदरचा मृत्यु हा “Cardic respiratory failure due to Hypovolemic Shocks and Dehydration” यामुळे झाला असल्याचे नमुद आहे.
(४) मृत विद्यार्थीनीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत म्हणून सानुग्रह अनुदान शासनाकडुन रु. १ लाख व संबंधित संस्थेकडुन रु. १ लाख असे एकुण रु. २ लाख देण्यात आले आहेत. तसेच शाळेमधील विद्यार्थ्यांसाठी लागणारे अन्न शाळेमध्येच शिजविले जाते. अन्नपुरवठा कोणत्याही कंत्राटदाराकडून केला जात नाही. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) शहर व ग्रामीण भागात वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत**

**(२७) * ४७३८८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) शहर व ग्रामीण भागात कमी क्षमतेचे रोहित्र तसेच उच्च व लघुदाबाच्या २५ ते ३० वर्षापूर्वी टाकण्यात आलेल्या वीज वाहिन्या जीर्ण झाल्यामुळे वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पनवेल तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात ठिकठिकाणी मोडकळीस आलेले सिमेंटचे खांब व जीर्ण झालेल्या विद्युत तारा बदलण्याची संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांना नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वारंवार मागणी करुनही वीज प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

पनवेल तालुक्यातील विशेषत: शहरातील काही भागातील उपरीतार वाहिन्या ३० वर्षाहून जुन्या झाल्याकारणाने वादळवाऱ्यात झाडांच्या फांदया पडून वीज पुरवठा खंडीत होण्याच्या घटना पावसाळयात घडून येत असतात.
(२) हे अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निवदेनाच्या अनुषंगाने पनवेल शहरातील सुशोभिकरण करण्यासाठी उपरीतार लघुदाब व उच्चदाब वाहिन्यांचे भुमिगत वाहिन्यांत रुपांतर करण्याकरिता महावितरण कडून रु. १५१.५३ कोटींचा डीपीआर बनविण्यात आला असून सदर डीपीआर १.३ % डीडीएफ योजनेअंतर्गत समाविष्ट करुन पनवेल महानगरपालिकेकडे दि.२३.०२.२०२१ रोजी कार्यकारी अभियंता, महावितरण पनवेल शहर यांनी सादर केला आहे.

(३) शहरी व ग्रामीण भागासाठी अखंडीत वीज पुरवठा करण्याकरिता महावितरण तर्फे देखभाल दुरुस्ती, वितरण व्यवस्था सक्षमीकरण करण्याकरिता पायाभूत आराखडा तसेच राज्य व केंद्र शासनाच्या योजनांतून रोहित्र क्षमतावाढ, नविन रोहित्र, जिर्ण झालेले खांब, कमी दाबाचा वीज पुरवठा होणाऱ्या ठिकाणाच्या वीज खांब व तारा बदलणे इ. कामे करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राणी शिगांव शेतपाडा (जि.पालघर) येथील आदिवासींना वीज पुरवठा करण्याबाबत

**(२८) * ४७८४१ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर अणुउर्जा प्रकल्पापासून अवघ्या चार ते पाच किमी अंतरावर असलेल्या राणी शिगांव शेतपाडा (जि.पालघर) येथील आदिवासींना देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पुर्ण झाली असुनही आजतागायत वीज पुरवठा करण्यात आला नसल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पाड्यात तातडीने वीज पुरवठा करण्यासाठी पालघर जिल्हा प्रशासनाने १०.७० लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली असूनही अद्यापी वीज जोडणी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त ठिकाणी तात्काळ वीज पुरवठा होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
पालघर जिल्हयातील राणी शिगांव या गावाचे विद्युतीकरण झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, सदर गावाजवळील शेतपाडयात १९ शेतघरे असून सदर शेतपाडयातील रहिवाशांनी वीज जोडणीकरीता महावितरणकडे कोणताही अर्ज केलेला नाही.
(२) हे खरे आहे.
राणी शिगांव जवळील शेतपाडयात तातडीने वीज पुरवठा करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत आदिवासी उपयोजनेमध्ये रु. १०.७० लाख इतक्या निधीस दि.०९.०६.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) राणी शिगांव जवळील शेतपाडयातील १९ शेतघरांना वीज जोडणी देण्याचे काम महावितरणमार्फत पूर्ण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजर्षी शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती करिता विद्यार्थ्यांच्या जागा वाढविण्याबाबत

**(२९) * ४४६२६ श्री.सुनील राणे (बोरीवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजर्षी शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर होवून त्यांची परदेशातील नामांकित विद्यापिठांमध्ये प्रवेशासाठी निवड होवून देखील शिष्यवृत्ती वितरणाची प्रक्रिया प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांना प्रवेशा पासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये दरवर्षी वाढ होत असल्याने सन २०२२ पासून ५५ जागा वाढविण्याची घोषणा सामाजिक न्यायमंत्री यांनी करुनही अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात हंगाम संपूनही ऊस गाळप प्रलंबित असल्याबाबत

**(३०) * ४४६०४ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात चालू वर्षी ऊसाचे विक्रमी उत्पादन झाल्यामुळे गाळपाचा हंगाम संपूनही सुमारे ५२ लाख टन ऊस गाळप अद्यापही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खानदेशातील धुळे, नंदूरबार आणि जळगांव या जिल्हयात शेतकऱ्यांचा ऊस शेतातच पडून असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंगणगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील शेतकरी श्री.नामदेव आसाराम जाधव यांनी ऊस गाळपा अभावी व जय भवानी सहकारी साखर कारखान्याच्या नियोजनाच्या अभावामुळे शेतातील ऊसा सोबतच स्वत:ला पेटवून आत्महत्या केल्याचे दिनांक १५ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने शेतक-यांचा नेमका किती ऊस शिल्लक आहे याचे सर्वेक्षण देखील करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, दिनांक १ मे, २०२२ नंतर गाळप होणाऱ्या शेतकऱ्यांच्या उसाला रुपये दोनशे प्रती टन गाळप अनुदान व रुपये पाच प्रती किलोमीटर वाहतूक खर्च देण्याचा शासनाने निर्णय घेतला असला तरी झालेल्या नुकसानीच्या तुलनेत सदर भरपाई अत्यल्प असून एकरी एक लाख रुपयांचे अनुदान देण्यात यावे, अशी मागणी ऊस उत्पादक शेतकरी संघटनांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, गाळप अनुदान कारखान्यांना देण्यात येत असल्यामुळे त्याचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांना होत नाही, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त ऊस उत्पादक शेतकऱ्यांना व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून तातडीने आर्थिक मदत मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) हे खरे नाही.

गाळप हंगाम २०२१-२२ मध्ये गाळपाविना ऊस शिल्लक राहिलेला नाही.

(३) व (४) कै. नामदेव अशोक जाधव यांचे हिंगणगांव ता. गेवराई, जि. बीड यांनी गट नं.४४ मध्ये त्यांच्या वडिलांच्या नावे असलेल्या क्षेत्रात २ एकर ऊसाची लागवड केली होती. त्यापैकी ४० आर. क्षेत्रावरील ऊस सन-२०२१-२२ या गाळप हंगामासाठी श्री. रामेश्वर सहकारी साखर कारखाना लि. रावसाहेबनगर, ता. भोकरदन, जि. जालना या कारखान्याने दि.०८/१२/२०२१ व दि.११/१२/२०२१ रोजी तोडणी केला असून कारखान्याने प्रति मे. टन रू. १,८००/- प्रमाणे एकूण रक्कम रू.४५,२९७/- त्यांना बुलढाणा अर्बन को- ऑप बँक, शाखा - गेवराई येथे वर्ग करून अदा केलेली आहे. उर्वरित ४० आर. क्षेत्रातील ऊस श्री. रामेश्वर कारखान्याने तोडणीस मागितला असता तो ऊस जयभवानी साखर कारखान्यास देणार असल्याचे कारण देऊन ऊस तोडू दिला नाही. तथापि जयभवानी साखर कारखान्याकडे सदर ऊसाची नोंद अथवा करार केलेला नाही.तसेच ऊस घेऊन जाणेबाबत कारखान्याशी त्यांनी कोणताही संपर्क किंवा लेखी पत्रव्यवहार केलेला नाही. गाळप हंगाम २०२१-२२ मध्ये गाळपाविना शेतकऱ्यांचा ऊस शिल्लक राहिलेला नाही.

(५), (६) व (७) गाळप हंगाम २०२१ -२२ मध्ये उसाचे विक्रमी उत्पादन झाले आहे.

साखर कारखाने बंद झाल्यास शेतकऱ्यांचा ऊस गाळपाविना शिल्लक राहील आणि शिल्लक राहिलेल्या ऊसास नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवु शकेल ही बाब लक्षात घेता शेतकऱ्यांचा शिल्लक ऊस गाळप होण्यासाठी दि. १.५.२०२२ नंतर गाळप होणाऱ्या शेतकऱ्यांच्या उर्वरित सर्व ऊसाला ऊस गाळप अनुदान म्हणुन रु. २०० प्रति टन प्रमाणे संबंधित साखर कारखान्यांना अनुदान देण्याचा तसेच साखर आयुक्तालयाने अनिवार्य वितरीत केलेल्या ऊसासाठी ५० कि.मी. अंतर वगळुन वाहतुक खर्च प्रति टन प्रति कि.मी. रुपये ५ दराप्रमाणे ऊस वाहतुक अनुदान देण्याचा निर्णय दिनांक २८.०४.२०२२ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत शासनाने घेतला आहे.

-----------------

## महाड व पोलादपूर (जि.रायगड) मध्ये गतवर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे दरड कोसळून तळीये व इतर गांवात झालेली जीवित व वित्तहानी

**(३१) * ४४७२८ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड व पोलादपूर (जि.रायगड) मध्ये दिनांक २२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या मुसळधार पावसामुळे तळिये गावासह सुतारवाडी तसेच मौजे केवनाळे गावावर दरड कोसळल्याने अनेकांचे मृत्यु झाले असून घरांचे देखील नुकसान झाले होते, परंतु सदर दुर्घटनेमुळे या गावाच्या पुनर्वसनाचे काम तात्पुरता कंटेनर उभारुन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हात भूवैज्ञानिकांनी केलेल्या सर्वेक्षणात ७२ गावांना दरडी कोसळण्याचा धोका असल्याचे निर्दशनास आणले होते हे खरे आहे काय, तसेच राजापूर तालुक्यातील शिवणे बुद्रुक येथे देखील गेल्यावर्षी दरड कोसळून नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावांच्या पुनर्वसनाचे काम कायमस्वरुपी करण्याच्यादृष्टिने आवश्यक असलेली जागा तालुक्यातील जमिन मालकांनी देऊन पुनर्वसनासाठी लागणारा निधी टाटा समुह व कोटक महेंद्रा यांच्याकडून उपलब्ध करुन दिला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गावांचे कायमस्वरुपी पुनर्वसन तात्काळ करण्याच्यादृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, कोकणात महापूर व दरड कोसळून वित्त व जीवित हानी होऊ नये याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

तथापि, राजापूर तालुक्यातील शिवणे बुद्रुक येथे गेल्यावर्षी दरड कोसळून नुकसान झाले नाही.

(३) व (४) मौजे साखर (सुतारवाडी), ता. पोलादपूर जि.रायगड व मौजे केवनाळे ता.महाड जि.रायगड या गावातील कुटुंबांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने पुनर्वसनासाठी आवश्यक असलेली जागा जमीन मालकांनी दिली आहे. मौजे साखर (सुतारवाडी) व मौजे केवनाळे या गावातील कुटुंबांसाठी घरांचे बांधकाम अनुक्रमे टाटा ट्रस्ट ऑफ इंडिया व कोटक महिंद्रा बँक यांच्यामार्फत करण्यात येत आहे. या संस्थांमार्फत त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही. याशिवाय मौजे साखर व मौजे केवनाळे या गावांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाच्या अनुषंगाने नागरी सोयी-सुविधांकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(५) दरडग्रस्त व पूरग्रस्त गावातील नागरीकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यात येते. आपत्तीच्या कालावधीत घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना नागरीकांना देण्यात येतात. तसेच, आपत्तीच्या अनुषंगाने नागरीकांची जनजागृती करण्यात येते. दरडप्रवण व सौम्यीकरण या विषयावर अधिकारी व कर्मचारी वर्गांची कार्यशाळा घेऊन त्यांना माहिती पुस्तिका देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील इतर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाबाबत

**(३२) * ४४६०२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओबीसी आरक्षणासाठी आवश्यक असलेला इम्पिरिकल डेटा योग्य स्वरुपात सादर न केल्याने शासनास मा.सर्वोच्च न्यायालयात ओबीसी आरक्षण टिकवण्यात अपयश आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ओबीसी आरक्षण पुर्ववत करण्यासाठी तयार करण्यात येणारा इम्पिरिकल डेटा गोळा करण्याची प्रक्रीया सदोष असल्याचे पत्र काही जेष्ठ नेत्यांनी मा.मुख्यमंत्र्यांना दिनांक १४ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरहू कामासाठी राज्य मागास आयोगाला ४३१ कोटी रुपयांची तरतूद करुनही निधीचे वितरण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ओबीसी आरक्षणासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या बांठिया आयोगाची रचना, कार्यपद्धतीमध्ये त्रुटी असल्याचे मूळ याचिकाकर्त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त डेटा गोळा करण्यासाठी मतदान प्रतिनिधी (BLO)ची नेमणूक करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने ओबीसी आरक्षण पुर्ववत करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) अशी बाब आढळून येत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) निरंक.

-----------------

**आदिवासी विभागांतर्गत रस्ते व पूल बांधण्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३३) * ४४६०७ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास मंत्री यांनी आदिवासी विभागांतर्गत ५०० कोटी रुपयांच्या रस्ते व पूल दुरुस्ती कामांना दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास मंजुरी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यस्तरीय लेखाशीर्षा अंतर्गत उक्त विभागात २५० कोटी रुपये शिल्लक असतानाही ५०० कोटी रुपयांच्या रस्ते व पूल दुरुस्ती कामांना नियमबाह्य पद्धतीने आदिवासी विकास मंत्री यांनी मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नियमबाह्य मंजुरीविरुध्द त्याच खात्याच्या राज्यमंत्र्यांनी आक्षेप नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासी विकास विभागाने याबाबत वस्तुस्थिती तपासली असता ही कामे नियमबाह्य असल्याचे स्पष्ट झाले असून या कामांना स्थगिती देण्याचे आदेश राज्याच्या मुख्य सचिवांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या अनियमिततेची शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
तथापि, मंजूर केलेल्या कामांपैकी काही कामे ही निकषात मोडत नसल्याची बाब निदर्शनास आली असल्याने सदर कामांना कार्यारंभ आदेश न देता त्याच्या प्रशासकीय मान्यता रद्द करण्याबाबत तत्कालीन राज्यमंत्री, आदिवासी विकास यांनी दि. २०/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना कळविले होते.
(४) व (५) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. २५/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संबंधित जिल्हा परिषदांकडून अहवाल मागविण्यात आला असून शासनाचे पुढील आदेश येईपर्यत सर्व मंजूर कामांना स्थगिती देण्यात आलेली आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.